# मुंबई विद्यापीठ

नेमणूक कक्ष, परीक्षा विभाग,
विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई-४०० ०९८.

क्र. AU/ICC/2023-24/20

परिपत्रक :

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख / विद्यापीठ संलग्नित कला / वाणिज्य / विज्ञान/व्यवस्थापन / शिक्षणशास्त्र / औषधशास्त्र / अभियांत्रिकी व विधी महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, प्राचार्य, सर ज. जी / वास्तुशास्त्र महाविद्यालय / समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अंबाडवे / समन्वयक, विजयलक्ष्मी दळवी महाविद्यालय तळेरे / समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र/समन्वयक, ठाणे परिक्षेत्र / समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड अप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विद्यापीठाचे परिपत्रक क्र. AU/ICC/2023 -24/02, दिनांक 13 सेप्टेंबर, 2023 व क्र. AU/ICC/2023 -24/17, दि. २६ फेब्रुवारी, २०२४ नुसार संगणक प्रणाली द्वारे भरण्यात आलेली आहे. परंतु त्यामध्ये काही तृटी आढळून येत आहेत. (उदा. शिक्षक सेवानिवृत्त झाले किंवा महाविद्यालायची सेवा सोडून गेले आहेत त्यांची नावे अजूनही कमी करण्यात आलेली नाहीत इत्यादी). प्रथम सत्र – २०२४ परीक्षा मार्च, २०२४ पासून सुरू होत असल्याने सदर संगणक प्रणाली द्वारे आध्यायवत केलेली माहिती शनिवार, दिनांक १६ मार्च, २०२४ पर्यंत पुन:श्च पडताळून http://121.241.25.46/ या (Teacher Information Link) लिंकवर आध्यायवत करण्यात यावी. तसेच ज्या विद्यापीठ विभागांमध्ये / महाविद्यालयांमध्ये / संस्थांमध्ये / उपकेंद्रांमध्ये NEP चे अभ्यासक्रम शिकविले जातात त्यांनी संबंधित NEP शिक्षकांची माहिती सुद्धा भारवी.

आपण आध्यावत केलेल्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल असतील तर ते तातडीने संगणक प्रणाली द्वारे आध्यायवत करण्यात यावेत. (उदा. शिक्षक सेवानिवृत्त झाले किंवा महाविद्यालायची सेवा सोडून गेले असतील तर त्यांची नांवे कमी करणे, शिक्षकांची नवीन नियुक्ती झाली असल्यास त्यांचे नाव वाढवून त्यांचा अनुभव नमूद करणे इत्यादी.)

तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, अध्यावत करण्यात आलेली माहिती अचूक असणे आवश्यक असून त्या माहितीच्या आधारे प्रथम सत्र-२०२४ साठी प्राश्निक, परीक्षक, नियामक आणि भाषांतरासाठी लागणारे शिक्षक यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तरी आपण अध्यावत केलेली माहिती अचूक नसल्यास त्या माहितीच्या आधारे करण्यात आलेली नियुक्त्या चुकीच्या झाल्या (उदा. शिक्षक सेवानिवृत्त झाले, महाविद्यालय सोडून गेले किंवा ते तो विषय शिकवत नाहीत) तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य/ संस्थेचे संचालक/ उपकेंद्राचे समन्वयक यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई -४०० ०९८.
१५ मार्च, २०२४

Raundale
संचालक,
परिक्षा व मूल्यमापन मंडळ

F:\Desktop\Aasha\asha.docx